महाराष्ट्र शासन
उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे तालुका यांचे कार्यालय
प्रशासकीय संकुल, जुने जिल्हाधिकारी कार्यालय आवार, धुळे-४२४००१
दूरध्वनी क्रमांक- ०२५६२-२२९६३० ई-मेल:- dyrdle@gmail.com

रजिस्टर पोस्टाने (पोच पावतीसह)

2019 जा.क्र.वि-१/क.७८-अ/नेरप./वि.का./आदेश/सन २०१६
दिनांक २९ जुलै, २०१६

## महाराष्ट्र सहकारी संस्था,अधिनियम १९६० चे कलम-७८अ अन्वये आदेश

प्रति,

१) श्री.राजाराम हिराजी माळी, मु.पो.नेर, ता.जि.धुळे
२) श्री.विठ्ठल जंगलु माळी, मु.पो.नेर, ता.जि.धुळे
३) श्री.आनंदा दयाराम माळी, मु.पो.नेर, ता.जि.धुळे
४) श्री.चुडामण धुडकु माळी, मु.पो.नेर, ता.जि.धुळे
५) श्री.पुंडलिक भावजी माळी, मु.पो.नेर, ता.जि.धुळे
६) श्री.शेनपडु वेडु भिल, मु.पो.नेर, ता.जि.धुळे
७) श्रीमती सुमन राजाराम माळी, मु.पो.नेर, ता.जि.धुळे
८) श्रीमती उषाबाई पुरुषोत्तम माळी, मु.पो.नेर, ता.जि.धुळे
९) श्री.बाबुलाल रामजी माळी, मु.पो.नेर, ता.जि.धुळे
१०) श्री.मधुकर पुंडलिक अहिरे, मु.पो.नेर, ता.जि.धुळे
११) श्री.निंबा सुकलाल माळी, मु.पो.नेर, ता.जि.धुळे
१२) शेख युनुस शेख फरिद, मु.पो.नेर, ता.जि.धुळे

कार्यालय जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, धुळे
दिनांक - 1/8/2016
शाखा - वि-१
आवक क्रमांक - 4466
का.अ
नि.

वरील सर्व समिती सदस्य,नेर पश्चिम भाग विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि.नेर ता.जि.धुळे

ज्याअर्थी, नेर पश्चिम भाग विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि.नेर, ता.जि.धुळे ही सहकारी संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्या खालील नियम १९६१ मधील तरतुदीनुसार नोंदणीकृत सहकारी संस्था आहे.सदरची संस्था या कार्यालयाच्या अधिकार कक्षेत येते.

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम १९६१ मधील तरतुदी, नोंदणीकृत उपविधी, शासनाचे आदेश व परिपत्रकीय सूचना यानुसार कामकाज करणे सदर संस्थेवर बंधनकारक आहे.

548
3/8/16

ज्याअर्थी, सदर संस्थेचे चेअरमन श्री.राजाराम हिराजी माळी यांनी दिनांक १६/६/२०१६ रोजी मा.ना. पालकमंत्री महोदय,धुळे जिल्हा यांना सादर केलेल्या अर्जानुसार संस्थेच्या शेतकरी सभासदांना पीक कर्ज वाटप करणे बाबत दिनांक २१/६/२०१६ रोजी या कार्यालयात सभा आयोजित करण्यात आली होती. सदर सभेस

(कृ.मा.प.)

संस्थेचे चेअरमन श्री.राजाराम हिराजी माळी, समिती सदस्य चुडामण धुडकु माळी, धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. धुळे बँकेचे प्रतिनिधी श्री.बापुराव पाटील, विभागीय अधिकारी श्री.सुभाष शिंदे, नेर शाखेचे बँक तपासणीस श्री.अनंत ठाकुर आणि संस्थेचे सचिव श्री.वसंत नैनसुख पाटील हे उपस्थित होते.सदर सभेत या कार्यालयाने दिलेल्या सूचनांनुसार सदर संस्थेचे चेअरमन व समिती सदस्य यांनी मान्य केले की, बँकेच्या कर्ज धोरणानुसार पीक कर्ज वाटपासाठी आवश्यक ती कार्यवाही करु. तसेच बँकेच्या प्रतिनिधी यांनी सांगितले की, बँकेच्या कर्ज धोरणानुसार संस्थेने कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतरच पीक कर्ज वाटप करण्यात येईल.त्यानुसार संस्थेने पीक कर्ज वाटपाच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही पाच दिवसांच्या आत पुर्ण करावी व तसा अहवाल या कार्यालयास सादर करणेबाबत सूचित केले.

ज्याअर्थी, बँक तपासणीस श्री.अनंत ठाकुर यांनी त्यांचे कडील पत्र जा.क्र.४९/I/१७, दिनांक २७/६/२०१६ अन्वयें अहवाल सादर करुन या कार्यालयाचे निदर्शनास आणुन दिले आहे की, सदर संस्थेचे चेअरमन यांनी बँकेच्या कर्ज धोरणानुसार कर्ज वाटप अटी व शर्ती मधील अट क्र.१० व १२ ची पुर्तता करण्यास नकार दिला आहे.संस्थेचे सचिव श्री.वसंत नैनसुख पाटील यांनी दिनांक २३/६/२०१६ रोजी पीक कर्ज वाटप करण्याच्या अनुषंगाने समिती सभेचा अजेंडा तयार करुन चेअरमन श्री.माळी यांचेकडे प्रत्यक्ष जाऊन अजेंडयांवर सहया करणे बाबत विनंती केली असता चेअरमन यांनी अजेंडयावर सहया न करता सर्व अजेंडे स्वत: हातात घेऊन निघुन गेलेत व कुठल्याही प्रकारची मिटींग घ्यायची नाही तसेच बँकेचे कर्ज वितरणाचे धोरण मला मान्य नाही असे सांगुन निघुन गेलेत.संस्थेचे चेअरमन श्री.माळी. हे योग्य निर्णय घेत नाहीत.त्यामुळे बँकेस गरजु सभासदांना कर्ज वाटप करता येत नाही.त्यामुळे योग्य ती कार्यवाही होणे बाबत विनंती केली आहे.

ज्याअर्थी, सदर संस्थेची समिती आणि उक्त नमूद समिती सदस्य त्यांची कार्ये पार पाडण्याचे नाकारीत आहे असे माझ्या निदर्शनास आले आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८-अ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार नेर पश्चिम भाग विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि.नेर, ता.जि.धुळे या संस्थेच्या उक्त नमुद सर्व समिती सदस्यांना या कार्यालयाकडील जा.क्र.वि-१/क.७८-अ/नेरप./वि.का./कादानो/सन २०१६ दिनांक ४ जुलै, २०१६ अन्वये कारणे दाखवा नोटीस देवून समिती सदस्य हे संस्थेची कार्ये पार पाडण्याचे नाकारीत असल्याने संस्थेच्या समितीस निष्प्रभावित का करण्यात येवू नये? या बाबतचा लेखी निवेदन/ खुलासा सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासुन पंधरा दिवसांच्या आत या कार्यालयास सादर करावा. तसेच दिनांक २१ जुलै, २०१६ रोजी दुपारी ठिक ४-०० वाजता आपले म्हणणे मांडणेसाठी या कार्यालयात समक्ष उपस्थित राहणेबाबत कळविण्यात आले होते. तसेच चेअरमन/मुख्य कार्यकारी अधिकारी, धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.धुळे यांना कळविण्यात आले होते की, नेर पश्चिम भाग विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि.नेर ता.जि.धुळे ही संस्था सदर बँकेस संलग्न असल्याने उक्त नमुद कारवाई बाबत लेखी म्हणणे तात्काळ या कार्यालयास सादर करावे.

ज्याअर्थी, सदर संस्थेचे चेअरमन श्री.राजाराम हिराजी माळी यांनी दिनांक १४/७/२०१६ रोजीच्या पत्रान्वये पुढीलप्रमाणे खुलासा सादर केला आहे.

१) धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.धुळे बँकेकडून मागील २ वर्षापासुन गरजु व लाभार्थी शेतक-यांना तात्काळ कर्ज उपलब्ध होण्यासाठी शासनस्तरावर व बँकेकडे अनेकदा तोंडी व लेखी पाठपुरावा केलेला आहे.परंतु, बँकेने आजपर्यंत कर्ज उपलब्ध करुन दिलेले नाही. बँकेकडून कर्ज मिळणेसाठी योग्य संपूर्ण ते सहकार्य केलेले आहे. संस्थेने यापुर्वी बँकेला रुपये ७८ लाखांचा बोजा संस्थेच्या असलेल्या मिळकतीवर चढवून दिलेला आहे. तसेच ज्या शेतक-यांना बँक कर्ज देत असेल ते शेतकरी सातबारा उता-यावर बोजा चढवून देण्यास तयार आहे.

२) संस्थेचे सेक्रेटरी श्री.वसंत नैनसुख पाटील यांनी दिनांक २३/६/२०१६ रोजी सात कोरे अजेंडे आणले प्रत्यक्षात दहा संचालक व एक ऑफीससाठी कॉपी असे असतांना त्यांनी सात अजेंडे दिले व ते देखील विना तारीख व क्र.असलेले अजेंडे आणून माझ्या कडे देवून निघून गेले व त्याबद्दल कोणतीही चर्चा केली नाही. संस्थेचे सचिव यांनी राजीनामा दिल्यामुळे कामाची टाळाटाळ करीत आहेत. त्यामुळे पिक कर्ज वाटपामध्ये अडचणी येत आहेत. जिल्हा देखरेख संघ धुळे यांचे कडे नविन सक्षम सेक्रेटरी मिळण्यासाठी किंवा संस्थेची मिटींग व कामकाज होण्यासाठी व दप्तर ताब्यात मिळणेसाठी दिनांक ५/७/२०१६ रोजी अर्ज दिला आहे. परंतु त्यावर काहीही कार्यवाही झालेली नाही.

३) या कार्यालयाकडील दिनांक ४ जुलै,२०१६ रोजीची कारणे दाखवा नोटीस मागे घेण्याबाबत विनंती केली आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.धुळे यांनी त्यांचे कडील पत्र जा.क्र.६०/कर्ज/२९३७ दिनांक ८/७/२०१६ अन्वये त्यांचे पुढील प्रमाणे म्हणणे सादर केले आहे-

१) सदर संस्थेच्या पंचकमेटी मधील काही सदस्य दिनांक ३१/३/२०१६ अखेर थकबाकीदार असल्याने संस्थेस दिनांक १/४/२०१६ पासून नविन पिक कर्ज वितरणाची अडचण आलेली आहे.

२) याबाबत संस्थेचे चेअरमन यांना बँकेचे तपासणीस यांनी सूचना देवून देखील चेअरमन यांनी संबंधीत थकबाकीदार सदस्यांविरुध्द कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

३) सदर संस्था बँक कर्ज व मेंबर कर्ज यांच्या अनिष्ट तफावती मध्ये आहे.

४) सदर संस्थेच्या सदस्यांनी अनिष्ट तफावती मधील मंजूरी पत्रकातील १ ते ११ अटींची पुर्तता करुन दिलेली नाही. याबाबत बँकेने संबंधीत संस्थेस ३ वेळा पत्रव्यवहार केलेला असून संस्थेने काहीएक प्रतीसाद दिलेला नाही. शासनाच्या सुलभ पिक कर्ज अभियान अंतर्गत बँक पिक कर्ज वाटपाचे कामकाज करीत असून सदर संस्थेच्या पात्र सभासदांना पिक कर्ज वाटपाची पुर्ण तयारी बँकेची आहे. परंतु संस्था चालकांच्या असहकार्यामुळे पिक कर्ज वाटपास विलंब झालेला आहे. त्यास बँक व बँकेचा कोणताही घटक जबाबदार नाही. यास्तव आपल्या पुढील आदेशाच्या प्रतिक्षेत बँक आहे.

ज्याअर्थी, दिनांक २१ जुलै, २०१६ रोजीच्या सुनावणीस संस्थेचे चेअरमन श्री.राजाराम हिराजी माळी, संस्थेचे संचालक श्री. चुडामण धुडकू माळी आणि श्री.शेनपडू वेडू भिल हे उपस्थित होते. सदर वेळी संस्थेचे चेअरमन श्री.माळी यांनी सांगीतले की, दिनांक २१/६/२०१६ रोजी झालेल्या सभेत चेअरमन व सचिव यांनी मान्य केल्याप्रमाणे बँकेस कर्ज वितरणासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे करुन दिलेली नाहीत. कलम

७८अअन्वयेच्या नोटीसीस अनुसरुन खुलासा सादर केलेला आहे. त्यामुळे दिनांक ४ जुलै,२०१६ रोजीची कारणे दाखवा नोटीस मागे घेण्याबाबत विनंती केली आहे.

ज्याअर्थी, सदर संस्थेचे पिक कर्ज वाटप होण्याच्या अनुषंगाने संस्थेने दिनांक २९/७/२०१६ रोजी संस्थेच्या संचालक मंडळाची सभा आयोजित केली होती परंतु सदर सभेस १२ पैकी ५ संचालक/संचालीका उपस्थित होते. त्यामुळे संस्थेचे कामकाज होऊ शकले नाही. सदर कामी संस्थेचे संचालक मंडळ टाळाटाळ करीत असल्याचे माझ्या निदर्शनास आले आहे.

त्याअर्थी, मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

मी, किशन रत्नाळे,उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे तालुका मला महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८-अ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार नेर पश्चिम भाग विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि.नेर, ता.जि.धुळे या संस्थेचे उक्त नमुद सर्व समिती सदस्य संस्थेची कार्ये पार पाडण्याचे नाकारीत असल्याने त्यांना निष्प्रभावित करण्यात येत आहे. सदर संस्थेचे पिक कर्ज वाटप होण्याच्या अनुषंगाने आणि दैनंदिन कामकाज करण्यासाठी श्री.ए.एम.ठाकूर, बँक तपासणीस, धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.धुळे शाखा नेर ता.जि.धुळे यांची प्रशासक पदी नेमणूक करण्यात येत आहे. श्री.ठाकूर यांनी तात्काळ सदर संस्थेचा पदभार घेऊन कामकाज करावे.

सदरचा आदेश माझ्या सही शिक्यानिशी व कार्यालयीन मुद्रेसह दिला आहे.

**ठिकाण- धुळे**
**दिनांक- २९ जुलै,२०१६**

सहकारी संस्था धुळे तालुका

(किशन रत्नाळे)
**उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, धुळे तालुका**

**प्रत -**

१) म.चेअरमन/मुख्य कार्यकारी अधिकारी, धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.धुळे
२) विभागीय अधिकारी, धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.धुळे दक्षिण विभाग,धुळे ता.जि.धुळे
३) श्री.ए.एम.ठाकूर, प्रशासक, नेर पश्चिम भाग विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि.नेर, ता.जि.धुळे तथा बँक तपासणीस, धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.धुळे शाखा नेर ता.जि.धुळे
४) सचिव, नेर पश्चिम भाग विविध कार्यकारी सहकारी सोसायटी लि.नेर, ता.जि.धुळे
५) सदस्य सचिव, जिल्हा स्तरीय समिती, धुळे व नंदुरबार

**प्रत-माहितीसाठी सविनय सादर.**

मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे

**उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, धुळे तालुका**